मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र. १०६७७/२०१६ मधील अवमान याचिका क्र. ५६८/२०१७ व संलग्न याचिकांमध्ये शासनाची बाजू मांडण्यासाठी नियुक्त केलेले स्पेशल कौन्सिल ॲड. रामचंद्र आपटे, सिनिअर ॲडव्होकेट यांचे विधि शुल्क अदा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक:- याचिका २०२५/ प्र.क्र. १७१ (ई-१३९२४३६)/ एसडी-१
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १२ ऑगस्ट, २०२६.

वाचा :-

१) सह सचिव, विधि व न्याय विभाग यांचे पत्र, क्र. ५३-२०२५/ E/ Computer No. १३९२४३६, दि.०५.०२.२०२६.

२) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद दाखल रिट याचिका क्र. १०६७७/२०१६ मधील अवमान याचिका क्र. ५६८/२०१७ मध्ये पारित केलेले आदेश, दि. २६.०३.२०२६.

३) ॲड. श्री. रामचंद्र आपटे, विशेष समुपदेश यांचे विधि शुल्क आकारणीचा तपशिल दि.२६.०३.२०२६.

प्रस्तावना :-

अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत विशेष शिक्षकांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र. १०६७७/२०१६ मधील अवमान याचिका क्र. ५६८/२०१७ दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी इतर याचिका संलग्न केल्या होत्या. सदर याचिकांमध्ये विभागाने प्रस्तावित केल्याप्रमाणे ॲड. रामचंद्र आपटे, सिनिअर ॲडव्होकेट यांची स्पेशल कौन्सिल म्हणून विधि व न्याय विभागाच्या दि. ०५.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये नियुक्ती करण्यात आली होती. सदर याचिका मा. न्यायालयाने दि. २६.०३.२०२६ रोजी आदेश पारित करून निकाली काढण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त न्यायालयीन प्रकरणामध्ये ॲड. आपटे यांनी मा. उच्च न्यायालयात शासनाच्या वतीने बाजू मांडली आहे. याकरिता ॲड. आपटे यांच्याकडून प्रती सुनावणी रु. ३,००,०००/- व इतर बाबी याकरिता एकूण रु. ११,६०,०००/- इतक्या रकमेचा तपशिल शासनास सादर केलेला आहे. परंतु, विधि व न्याय विभागाने, दि. ०५.०२.२०२६ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केल्यानुसार, ॲड. आपटे यांना रु. २,००,०००/- प्रती सुनावणी शुल्क अदा करण्याचे नमूद केले आहे. त्यानुसार, ॲड. आपटे यांना सुनावणी शुल्क व इतर तपशिलाकरिता रु. ८,६०,०००/- इतकी रक्कम अदा करण्यासाठी समग्र शिक्षा योजनेचे (२२०२ आय ६१२), ३१- सहायक अनुदाने या राज्य हिश्श्याच्या लेखाशीर्षाखाली उपलब्ध असणाऱ्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र. १०६७७/२०१६ मधील अवमान याचिका क्र. ५६८/२०१७ व संलग्न इतर याचिकांमध्ये शासनाची बाजू मांडण्यासाठी ॲड. रामचंद्र आपटे यांना देय असलेल्या विधि शुल्काची रु. ८,६०,०००/- (अक्षरी रुपये :- आठ लाख साठ हजार रुपये) इतकी रक्कम उपलब्ध करून देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खर्च "मागणी क्र. ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०६-शिक्षक व इतर सेवा, (००) (००) (०१) समग्र शिक्षा अभियान (सर्वसाधारण) (राज्य हिस्सा ४० टक्के) (२२०२ आय ६१२) (कार्यक्रम), ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या वित्तीय वर्षामध्ये उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. वितरित करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र एक महिन्याच्या कालावधीत शासनास सादर करावे.

४. सदर निधी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे. सदर निधी सायबर कोषागार कार्यालयामार्फत (कोषागार संकेतांक-८१०१) आहरित करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्र. समग्र २०२५/ प्र. क्र. १४५/एसडी-१ दि.०९.०९.२०२५ व शासन निर्णय, क्र. संकीर्ण २४२५/ प्र. क्र. ६५/ अर्थसंकल्प (ई-१३४७२००), दि. १९.०९.२०२५ अन्वये राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" तसेच देयके आहरण व संवितरण करण्याकरिता उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना "आहरण व संवितरण अधिकारी" घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार वितरित करण्यात आलेला निधी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सुपूर्द करावा.

५. प्रस्तावित निधी वितरित करताना विहित कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

६. वित्त विभाग, शासन परिपत्रक दि. ०७.०४.२०२६ व दि. ०९.०५.२०२५ मध्ये नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता होत आहे. सदरचे अनुदान सशर्त अनुदान असून त्याकरिताच्या अटी व शर्ती या शासन निर्णयात नमूद केल्या आहेत.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. ४३०/व्यय-५, दि. २१.०७.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१२१८२९५९७६४९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIRUDDHA
AVINASH KULKARNI

Digitally signed by ANIRUDDHA AVINASH KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=6BD6E0EB7CC32C9F54ACB019718EA0605499E3BB30089069836D3DF755429241, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E39DE4E1B82CF27EFFB3E468969818A392B438DB03E37E0068C06FCF8E6BFD00, cn=ANIRUDDHA AVINASH KULKARNI
Date: 2026.08.12 18:30:50 +05'30'

(अनिरुध्द कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्यांक) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. अध्यक्ष / सभापती, विधानसभा / विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
६. मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, सर्व.
७. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
८. मा. विधान सभा / विधानपरिषद, विधानभवन, मुंबई (सर्व).
९. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
१०. प्रधान सचिव, (शालेय शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
११. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२ मुंबई, नागपूर.
१५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर.
१६. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई-६३.
१७. सर्व वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग).
१८. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
१९. उप सचिव, वित्त विभाग, (व्यय-५/अर्थसंकल्प शाखा), मंत्रालय, मुंबई.
२०. उप सचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. उप सचिव, (१४७१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२. अवर सचिव (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३. अवर सचिव/कक्ष अधिकारी, लेखाशाखा, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२४. निवड नस्ती (एसडी-१).